राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांच्या मुख्यालयात प्रतिनियुक्तीने नियुक्ती.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः संकीर्ण १०१७/प्र.क्र.११५/१४-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ०८ नोव्हेंबर, २०१७

शासन आदेश

श्री.र.ब.सुद, लिपिक-टंकलेखक, कृषि व पदुम विभाग यांची सेवा राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय, निर्मल इमारत, २ रा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१ यांच्या मुख्यालयातील लिपिक-टंकलेखकाच्या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. श्री.र.ब.सुद, लिपिक-टंकलेखक, कृषि व पदुम विभाग यांची, सेवा राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांच्या मुख्यालयातील, **लिपिक-टंकलेखक** या पदावर प्रथमत: **दोन वर्षाच्या कालावधीसाठी** खालील अटींच्या अधीन राहून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे:-

(अ) ज्या तारखेला शासकीय सेवेतील पदाचा कार्यभार सुपूर्द करील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला संबंधित कर्मचारी आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्वीकारील त्या तारखेला समाप्त होईल.

(ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्याला परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/संवर्ग नियंत्रण अधिकारी/सक्षम प्राधिकारी राखून ठेवील

(क) जर त्यांची सेवा स्वीयेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्याला मूळ विभागाकडे परत पाठवण्याची मुभा स्वीयेत्तर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठवण्यापूर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

(ड) त्याने मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्याला मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

३. प्रतिनियुक्तीच्या कालावधीत श्री.र.ब.सुद, लिपिक-टंकलेखक, यांना प्रतिनियुक्ती भत्ता देय असणार नाही. म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा...इ) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन) व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १७-१२-२०१६ मधील तरतुदी विचारात घेऊन कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग यांनी सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १८ यांच्याशी सल्लामसलत करुन प्रतिनियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती ठरवाव्यात.

४. श्री.र.ब.सुद, लिपिक-टंकलेखक यांच्या प्रशासकीय बाबी, कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग व सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १८ यांचेमार्फत हाताळण्यात येतील.

५. श्री.र.ब.सुद, लिपिक-टंकलेखक यांना प्रतिनियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी विभागाने तत्काळ कार्यमुक्त करावे.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०८१७५३१३८३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan
Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Andhra Pradesh, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2017.11.08 17:43:32 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री र.ब.सुद, लिपिक-टंकलेखक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

प्रत,

१ अ.मु.स (र. व का.)/अ.मु.स.(सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२ आयुक्त, राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, निर्मल इमारत, २ रा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१

३ सह/उप सचिव (आस्थापना), कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय,मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

त्यांना विनंती करण्यात येते की, सदर कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रतिनियुक्तीने राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांच्या मुख्यालयात उपलब्ध करुन देताना त्या संबंधिच्या अटी व शर्ती संदर्भात त्यांनी सा.प्र.वि./का.१८ यांच्याशी संपर्क करावा. तसेच अटी व शर्ती ठरविल्यानंतर म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा..इ.) नियम, १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन) मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती नमूद करुनच प्रतिनियुक्तीचे आदेश काढणे आवश्यक आहे. त्यानुसार काढलेल्या आदेशाची प्रत या कार्यासनाकडे तत्काळ पाठविण्यात यावी.

४ उप सचिव (का.क्र.१८), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

त्यांना विनंती करण्यात येते की, सदर कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रतिनियुक्तीने त्वरेने उपलब्ध होतील याबाबत त्यांनी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करावा.

५ साप्रवि/१४-अ (संग्रहार्थ).